**मे. वनअप डेव्हलपर प्रा. लि. सि. टी. एस. नं. १३२२, १३२२/१ आणि १३७६, सर्व्हे नं. १६१, वर्सोवा गाव, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३ येथे रहिवासी इमारती पुर्न:बांधणी प्रस्तावाच्या जन सुनावणीचे इतिवृत्त....**

| | | |
|---|---|---|
| जनसुनावणी दिनांक | : | १६/०८/२०१२ |
| वेळ | : | सकाळी १०.३० वाजता |
| स्थळ | : | श्री. सौराष्ट्र पटेल समाज हॉल, एम.टी.एन.एल. ऑफिस जवळ, पटेल इस्टेट रोड, जोगेश्वरी (प), मुंबई -४०० १०२ |

मे. वनअप डेव्हलपर प्रा. लि. यांचेकडून सि. टी. एस. नं. १३२२, १३२२/१ आणि १३७६, सर्व्हे नं. १६१, वर्सोवा गाव, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३ येथे रहिवासी इमारत पुर्न:बांधणीचा प्रस्ताव आहे. सदर प्रकल्पाची जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम २०११ चे कलम क्र. ८ (व्ही) डी सी ४ नुसार घेणे कायद्याने बंधनकारक आहे. हि जाहीर जनसुनावणी फक्त इमारतीचे कायदेशीर भाडेकरुं / रहिवाशां करीता आयोजित करण्याची तरतूद आहे.

प्रकल्प व्यवस्थापनाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे अर्ज केला असून, मप्रनि मंडळाने जिल्हाधिकारी मुंबई (उपनगरे) यांच्या परवानगीने १६/०८/२०१२ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतूदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. १४.०७.२०१२ रोजीच्या दैनिक फ्री प्रेस जरनल (इंग्रजी) व नवशक्ती (मराठी) या वर्तमानपत्रामध्ये नोटीस प्रसिध्द केली व त्यानुसार सर्व संबंधित व्यक्तींना आवाहन करुन त्यांच्या सुचना, टिकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी, संबधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत नमुद करण्यात आले होते.

कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत अ) जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (उपनगरे), ब) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई, क) प्रादेशिक अधिकारी मुख्यालय, मप्रनि मंडळ, सायन, मुंबई, प्रादेशिक कार्यालय ,मुंबई, उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई २, श्री छत्रपती शिवाजी महाराज महानगर पालिका मंडई, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, मुंबई - ४०० ००१ व ड) सहाय्यक म.न.पा. आयुक्त, वार्ड ऑफिस, एच /पश्चिम, सेंट मार्टीन रोड, वांद्रे (पश्चिम), मुंबई ४०० ०५० येथे संबंधितांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आले होते. उपरोक्त जाहीर जनसुनावणीबाबत नोटीफिकेशन मध्ये

नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्प बाधित अथवा संबंधीत व्यक्तींना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

सुनावणीचे स्थळ श्री. सौराष्ट्र पटेल समाज हॉल, एम.टी.एन.एल. ऑफिस जवळ, पटेल इस्टेट रोड, जोगेश्वरी (प), मुंबई -४०० १०२ ठेवण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाजवळचे असून संबंधितांना येण्यासाठी सोईस्कर असल्याने याठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली. सदर जनसुनावणी घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केंद्रीय पर्यावरण व वन विभागाचे पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मधील तरतुदीप्रमाणे लोकसुनावणीचे खालील प्रमाणे समिती गठीत केली होती.

१) श्री. भरत शितोळे - अध्यक्ष
प्रभारी अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.

२) डॉ. जि.बा.संगेवार - सदस्य
प्रादेशिक अधिकारी, मुंबई

३) श्री. रा. रा. वसावे - आयोजक
उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई २

जनसुनावणीच्या सुरूवातीस श्री. रा. रा. वसावे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई- २ यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यागतांचे स्वागत करून जनसुनावणीच्या पध्दतीबददल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी इमारतीच्या रहिवाशी / भाडेकरुंकरीता आयोजित केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न / शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

तद्नंतर जन सुनावणी समितीचे अध्यक्ष मा. उप जिल्हाधिकारी यांनी उपस्थित जनसमुदायास मे. वनअप डेव्हलपर प्रा. लि., मुंबई यांचे बांधकाम प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार, आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरूपात मांडाव्यात. आपण व्यक्त केलेले मत तसेच सूचना, आक्षेप व आपल्या भावना कायद्यात नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण प्रभाव निर्धारण प्राधिकरण महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई तसेच यांना कळविण्यात येतील. सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण म.प्र.नि मंडळाकडून कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे. तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व

सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापूर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करून सुनावणीच्या इतिवृतांत बनविते वेळी सदर बाबी नमुद करणे सोईचे होईल. त्यानंतर त्यांनी मे. वनअप डेव्हलपर प्रा. लि., मुंबई यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांचे प्रश्न व प्रकल्पाबाबत शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पाचे पर्यावरण विषयक तांत्रिक सल्लागार श्री. शेखर तमाने यांनी नियोजित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल खालील प्रमाणे मराठी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पांचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमिन, ध्वनी, विस्थापन इत्यादी बाबतची माहिती.
- नियोजित प्रकल्पांमुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता व वन यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- बांधकाम व प्रकल्प चालू झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापनविषयीची माहिती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहिती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर प्रश्न उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पांच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्याचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

१. आयोजक, जनसुनावणी समिती

| अनु.क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून विकासकाने दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | सदर प्रकल्प कधी पुर्ण होणार? | संबंधित प्राधिकरणे व मुख्यत्वेकरुन पर्यावरण विभागाची मंजुरी (Environmental Clearance) मिळाल्यानंतर बांधकाम सुरु करण्यात येईल व प्रकल्प २ वर्षाच्या कालावधीत पुर्ण करण्यात येईल. |

२. रहिवाशी, श्री. अजय गोविंद हलदे, रुम नं. ११२, भारत नगर को.हौ.सो

| अनु.क्र | चर्चेतील मुदद |
|---|---|
| १ | सदर पुर्नबांधकाम प्रकल्पाबाबतचे प्रश्न आम्ही आमच्या लेखी अर्जात मांडलेले असून सागरी |

| | |
|---|---|
| | तटीय कायद्यान्वये अनुज्ञातीवेळी याचा विचार व्हावा हि विनंती. |

३. रहिवाशी, श्री. रंजित भोजणे, रुम नं. १००, भारत नगर को.हौ.सो.

| अनु.क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून विकासकाने दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | सि. आर. झेड. नियमानुसार या प्रकल्पातील बाधित व्यक्तींवर काय बंधने आहेत, तसेच पार्किंगची व्यवस्था कशी असेल? | सदर पुर्नबांधकाम प्रकल्प हा सि. आर. झेड. -२ या वर्गीकृत क्षेत्रात मोडत असून सदरील नियमाच्या अनुषंगाने म.प्र.नि. मंडळाने ही जाहीर जनसुनावणी आयोजित केलेली आहे. पार्किंगची व्यवस्था झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांच्या मार्गदर्शक प्रणालीप्रमाणे करण्यात येईल. |

४. रहिवाशी, श्री. शेख हैदर, रुम नं. ६७, भारत नगर को.हौ.सो

| अनु.क्र | चर्चेतील मुददे |
|---|---|
| १ | सदर पुर्नबांधकाम प्रकल्पाबाबतचे प्रश्न आम्ही आमच्या लेखी अर्जात मांडलेले असून सागरी तटीय कायद्यान्वये अनुज्ञातीवेळी याचा विचार व्हावा हि विनंती. |

५. अध्यक्ष , जनसुनावणी समिती

| अनु.क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून विकासकाने दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | सागरी तट विनियमन क्षेत्र (CRZ) ची संकल्पना मुळात सर्वांना ज्ञात आहे का? | सागरी तट विनियमन क्षेत्र (CRZ) अधिनियम १९९१ व २०११ बद्दल संक्षिप्त माहिती दिली व शासनाची भुमिका विशद केली. सदरील प्रस्तावित पुर्नबांधकाम प्रकल्प हा सि.आर.झेड-२ या वर्गीकृत प्रकारात मोडतो. |

६. रहिवाशी, श्री. मनोहर शिर्के, रुम नं. १०२, भारत नगर को.हौ.सो.

| अनु.क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून विकासकाने दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | म.प्र.नि. मंडळाने पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजित केली आहे. त्याचे मी स्वागत करतो. मात्र या प्रकल्पाबाबत आमच्या गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सर्वसाधारण सभेत याविषयी कोणताही प्रस्ताव अथवा | गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सभासदांना विश्वासात घेऊन या प्रकल्पाच्या पुर्नबांधणीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. |

| | |
|---|---|
| | चर्चा करण्यात आलेली नाही. |

७. रहिवाशी, श्री. रजिया बेगम, रुम नं. २५, भारत नगर को.हौ.सो.

| अनु.क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून विकासकाने दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | या प्रकल्पाबाबत आमच्या गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सभासदांना विकासकाने विश्वासात घेतलेले नाही. | गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सभासदांना विश्वासात घेऊन या प्रकल्पाच्या पुर्नबांधणीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. |

८. रहिवाशी, श्री. महेमुद खान, रुम नं. ७२, भारत नगर को.हौ.सो.

| अनु.क्र | चर्चेतील मुददे |
|---|---|
| १ | या प्रकल्पाच्या जनसुनावणीबाबतची सुचना आमच्या गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या सुचना फलकावर लावलेली होती. त्याअनुषंगाने आमच्या सभासदांच्या वतीने मी लेखी अभिप्राय सादर करीत असून सागरी तटीय कायद्यान्वये अनुज्ञातीवेळी याचा विचार व्हावा हि विनंती. |

९. रहिवाशी, श्री. एकनाथ वाघ, रुम नं. ४२, भारत नगर को.हौ.सो.

| अनु.क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून विकासकाने दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित पुर्नबांधकाम प्रकल्पात आम्हाला जास्तीचे चटई क्षेत्र मिळेल काय? तसेच विकासकाच्या प्रतिनिधींनी देऊळ उभारण्याच्या प्रस्तावाबरोबर बुद्धविहार वेगळे बांधण्याचा प्रस्ताव विचारात घ्यावा. इतर प्रस्तावित सुविधांबद्दल समाधानी असून सदर प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण व्हावा. | बुद्धविहार वेगळे बांधण्याचा प्रस्तावाबाबत पुर्नविचार करण्यात येईल. संबंधित प्राधिकरणे व मुख्यत्वेकरुन पर्यावरण विभागाची मंजुरी (Environmental Clearance) मिळाल्यानंतर बांधकाम सुरु करण्यात येईल व प्रकल्प २ वर्षाच्या कालावधीत पुर्ण करण्यात येईल. |

१०. रहिवाशी, श्री. समशिर खान, रुम नं. २४, भारत नगर को.हौ.सो.

| अनु.क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून विकासकाने दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | विकासकाबरोबर सन २००६ मध्ये आमचा या प्रस्तावित पुर्नबांधकाम प्रकल्पाबाबत करार झाला. तद्नंतर विकासकाने काही केलेले नाही. त्यामुळे या विकासकाऐवजी महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण संस्था यासारख्या नामांकित संस्थेमार्फत आमच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुर्नविकास व्हावा. | झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांचेकडून करारपत्र, (एल.ओ.आय.) घेण्यात आले असून तद्नंतरच्या संबंधित प्राधिकरणे व मुख्यत्वेकरुन पर्यावरण विभागाच्या मंजुरीसाठी (Environmental Clearance) चा प्रस्ताव सादर केला असून सर्व कायदेशीर परवानग्या मिळाल्यानंतर बांधकाम सुरु करण्यात येईल व प्रकल्प २ वर्षाच्या कालावधीत पुर्ण करण्यात येईल. |

आयोजकांनी लोकांना आव्हान केले की, तुमचे आणखी काही प्रश्न असतील तर ते उपस्थित करावे परंतु नंतर विकासक हा एकच सदस्य असल्यामुळे कोणी प्रश्न उपस्थित केले नाहीत.

आयोजकांनी जनसुनावणीच्या समारोपाच्या भाषणामध्ये जनसुनावणीचा आढावा घेतला व जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| ( रा. रा. वसावे)<br>उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, मुंबई-२<br>आयोजक<br>जनसुनावणी समिती | (डॉ. जि.बा.संगेवार)<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, मुंबई<br>तथा<br>सदस्य<br>जनसुनावणी समिती | ( भरत शितोळे)<br>प्रभारी अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी<br>मुंबईउपनगर जिल्हा.<br>तथा<br>अध्यक्ष<br>जनसुनावणी समिती |